# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादा**

क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ ५०६
दिनांक : 28 JUN 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.....

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक

३. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५५८, दिनांक २५.६.२०१९

४. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५६५, दिनांक २६.६.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत आहे.

पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी दिनांक २९.६.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर केलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने छाननी करुन ती माहिती आपल्या विभागाकडून दिनांक २.७.२०१९,सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रमाणित करण्यात यावी.

याबाबत संस्थांना http://technical.mahacet.org/ या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाइन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आली असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी .

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत वेळापत्रकानुसार जागावाटप प्रदर्शित करण्याचा कालावधी विचारात घेऊन सदर काम विहीत कालमर्यादेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे ही बाब विचारात घेऊन प्रथम प्राधान्याने माहिती भरणे व त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात यावी. संस्थांची मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शवून त्यानुसार प्रवेश करण्यात येणार असल्यामुळे या माहितीची अचूक पडताळणी करण्यात यावी. चुकीची माहिती भरली गेल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहील याचीही नोंद घेण्यात यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

---

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शैवि-1/पदवी/2019 1929
दिनांक:- 28 JUN 2019

प्रति,
प्राचार्य
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी, संस्था
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात नमूद केल्या प्रमाणे नागपूर विभागातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थानी विहित मुदतीत कार्यवाही करावी.

**(डॉ.चंद्रशेखर थोरात)**
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**